## वार्षिक अहवाल २०२५-२६

## बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**१०.१ अहवालाच्या कालावधीत ग्रंथ व नियतकालिके खरेदीसाठी खालील निधी मंजूर होता.**

अ) विद्यापीठ निधीः रू. २,९०,००,०००/-एवढी अंदाजपत्रकीय तरतूद अहवाल वर्षात नियतकालिके व ग्रंथ खरेदीसाठी उपलब्ध होती. सदर मंजूर निधीतून ई-संसाधने व डेटाबेस व नियतकालिकासाठी रु. २,६५,००,०००/- व मुद्रित ग्रंथखरेदीसाठी, ई- बुक्स खरेदीसाठी रु.२५ ,००,०००/-एवढी रक्कम उपलब्ध होती. सदर उपलब्ध निधीतून नियतकालिकांच्या (छापील व ऑनलाईन) आणि ई-संसाधने व डेटाबेस वर्गणीसाठी रु ६४,६९ ,३५८ /- आणि ग्रंथ/ ई- बुक्स खरेदीसाठी रु. २३ ,७५ ,९३१ /- रूपयांचा विनियोग करण्यात आला.

**१०.२ ग्रंथसंग्रहः**

अ) दि.३१/०३/२०२६ रोजी विद्यापीठ ग्रंथालयात वाचनसंग्रह साहित्याची (ग्रंथ, नियतकालिकांचे बांधीव संच व हस्तलिखिते) यांची एकूण संख्या खालीलप्रमाणे होती.

| ग्रंथ | ग्रंथ शिर्षके | ई-बुक्स | नियतकालिकांचे बांधीव संच | हस्तलिखिते | प्रबंध /लघुप्रबंध | रिपोर्ट | ब्रेल बुक्स | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २८८२४८ | २३९२३७ | १३०१ | ४०२४२ | ९१६३ | १२९१० | ७१२४ | ५९० | ३५९५७८ |

**ब) अहवाल वर्षातील वाढः** २०२५-२६ या अहवाल वर्षात विद्यापीठ निधीतुन १३३६ ग्रंथ खरेदी केलेले आहेत. इतर अधिविभाग/ कॉन्टीजन्सीद्वारे ३८९ ग्रंथ खरेदी केले आहेत. देणगीद्वारे आलेल्या ग्रंथांची संख्या ९२३ एवढी आहे. दुर्मिळ ग्रंथ विभागात देणगीद्वारे ५१ वाढ झाली. अशा रितीने, अहवाल वर्षातील एकूण ग्रंथसंख्या वाढ २६९९ आहे.

विद्याशाखा निहाय खरेदी केलेले ग्रंथ/ई-ग्रंथ यांची विभागणी पुढीलप्रमाणेः

| अ. क्र. | विद्याशाखेचे नाव | ग्रंथ | ई-ग्रंथ |
|---|---|---|---|
| १. | सायन्स आणि टेक्नॉलॉजी | १९८ | ७ |
| २. | वाणिज्य आणि व्यवस्थापन | १४ | -- |
| ३. | मानव्य विद्याशाखा | ३९३ | ७ |
| ४. | आंतरविद्याशाखा | २२२ | १७ |
| ५. | सामान्य | ५०९ | - |
| | **एकुण :-** | **१३३६** | **३१** |

क) कॉन्टीजन्सीमधून खालीलप्रमाणे ३८९ ग्रंथ संशोधन प्रकल्प /इतर योजना /इतर कोर्सेस व संशोधन योजने अंतर्गत खरेदी केले आहेत.

| Sr. No. | Budget Heads under Projects | No. of Books |
|---|---|---|
| 1 | Library & Inf. Science ( ICSSR Project) Dr. S.B. Patil (D.2.P.374) | 24 |

| Sr. No. | Budget Heads under Projects | No. of Books |
|---|---|---|
| 2 | Library & Inf. Science ( ICSSR Project) Dr. Y.G. Jadhav (D.2.P.373) | 12 |
| 3 | Ind. Chemistry (A.21.P.4) | 72 |
| 4 | Applied Chemistry (A.21.P.4) | 16 |
| 5 | Pad. Late Dr. G.G. Jadhav Chair in Journalism (A.70.P.4) | 22 |
| 6 | Commerce & Management (MBA) (A.57.P.4) | 215 |
| 7 | YCSSRD (A.67.P.4) | 5 |
| 8 | Geography (A.16.P.4) | 1 |
| 9 | Women Studies (A.39.P.4) | 2 |
| 10 | Journalism & Mass Comm. (A.33.P.4) | 3 |
| 11 | Music & Dramatics (A.38.P.4) | 17 |
| | **Total** | **389** |

ड) अहवाल वर्षात देणगीदारांकडून देणगीदाखल प्राप्त झालेल्या पुस्तकांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

1) ग्रंथ खरेदी विभाग

| अ. नं. | देणगीदाराचे नाव | ग्रंथ संख्या |
|---|---|---|
| 1. | पु . य. देशपांडे व विमलाबाई देशपांडे मेमोरियल ट्रस्ट नागपूर | 8 |
| 2. | डॉ. चेतना सोनकांबळे शिक्षणशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर | 5 |
| 3. | श्री. सुजित मुंढे, सोलापूर | 6 |
| 4. | रत्नत्रयी ट्रस्ट, अहमदाबाद<br>रत्नत्र | 3 |
| 5. | श्री. सुभाष धुमे, गडहिंग्लज, कोल्हापूर | 6 |
| 6. | Divine Life Society, Uttarakhand | 14 |
| 7. | श्री. अविनाश सहस्त्रबुद्धे संग्रह | 183 |
| 8. | डॉ. अजित यादव, कोल्हापूर | 3 |
| 9. | Mr. Smith Sheth, New Delhi | 13 |
| 10. | Dr. Damodar Magdum, मराठी देशा फाऊंडेशन, मुंबई | 11 |
| 11. | Mr. Vijay Shahaji Patil, Kolhapur | 4 |
| 12. | Smt. Rekha Dixit, Shukrawarpeth, Kolhapur | 4 |
| 13. | मुस्लीम समाज प्रबोधन व शिक्षण संस्था, कोल्हापूर | 588 |

| अ. नं. | देणगीदाराचे नाव | ग्रंथ संख्या |
|---|---|---|
| 14. | श्री. व्यंकाप्पा भोसले, कोल्हापूर | 4 |
| 15. | श्री. रणधीर शिंदे, मराठी विभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | 6 |
| 16. | डॉ. अवनीश पाटील, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | 6 |
| 17. | Dr. L. R. Tarodi, Kolhapur | 12 |
| 18. | Others | 47 |
| | Total | 923 |

2. **दुर्मिळ ग्रंथ विभाग** :

| अ.क्र. | देणगीदाराचे नाव | पुस्तकांची संख्या |
|---|---|---|
| 1 | Mr. Avinash Sahastrabuddhe. | 51 |
| | **Total** | **51** |

**इ) नियतकालिके विभागः**

अहवाल वर्षात ०१ विदेशी ऑनलाईन नियतकालिक आणि ०८ (JSTOR Archive Journal & Primary Source, J-Gate Science and Technology, J-Gate Social Science and Humanities, SciFinder Academic Unlimited Access Plan, Scopus, EPWRF India Time Series & Knimbus) डेटाबेस ची वर्गणी भरली तसेच ६७ भारतीय मुद्रित नियतकालिके खरेदी करण्यात आली व त्याप्रमाणे ती ग्रंथालयास प्राप्त झाली. २३९ छापील नियतकालिकांचे अंक देणगी स्वरूपात प्राप्त झाले आहेत. तसेच मराठी, इंग्रजी आणि हिंदी भाषेतील १० वर्तमानपत्रे वाचकांसाठी उपलब्ध केली आहेत.

**फ) प्रबंध - लघु प्रबंध व अहवाल विभागः**

अहवाल वर्षात ७ अहवालांची विभागात भर पडली. तसेच इनफ्लिबनेटच्या 'शोधगंगा' या संकेतस्थळावर अहवाल कालावधी अखेर एकूण ५६२४ प्रबंध उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

**१०.३ ग्रंथालयीन सेवाः**

**अ-पुस्तके व नियतकालिके देवघेव:**

वृत्तांत वर्षात नोंदलेल्या वाचकांची संख्या १७७८ एवढी आहे. या वर्षात देवघेव विभाग व टेक्स्ट बूक विभाग येथून एकूण २३१६८ ग्रंथांची देवाणघेवाण करण्यात आली. संलग्न महाविद्यालयातील व शैक्षणिक संस्था मधील ४ शिक्षकांनी ग्रंथालय सेवेचा लाभ घेतला. ग्रंथालय विभागात विद्यार्थ्यांसाठी 'मुक्तद्वार प्रवेश पध्दत' उपलब्ध आहे.

१. एकूण २८ वाचकांना आवश्यक ते शुल्क भरून संदर्भ सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

२. एकूण ८ ज्येष्ठ नागरिकांनी प्रत्येकी रु. १०००/- याप्रमाणे अनामत रक्कम भरून ग्रंथालयाचे कायमचे सभासदत्व घेतले आहे.

३. स्पर्धा परीक्षा व नेट / सेट इत्यादी परीक्षांना बसलेल्या २०६ विद्यार्थ्यांना अभ्यासिकेत बसण्यासाठी प्रत्येकी रू. ११७० /- मासिक शुल्क भरून ग्रंथालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

४. एकूण ०४ वाचकांनी झेरॉक्स सुविधेचा लाभ शुल्क भरून घेतला.

५. अहवाल वर्षापर्यंत एकूण १९२६ विविध विषयांवरील सीडी रोम उपलब्ध आहेत.

**ब.१. अभ्यासिका: बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्रः**

राष्ट्रीय सुट्टीचे दिवस सोडून इतर सर्व दिवशी सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत अशी १८ तास अभ्यासिका सुरू ठेवण्यात आली. अभ्यासिकेमध्ये दररोज सरासरी ३१८ विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. सदर अभ्यासिकेचे व्यवस्थापन डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनातील ‘कमवा व शिका’ या योजनेतून शिक्षण घेणाऱ्या अंशकालीन विद्यार्थ्यांमार्फत करण्यात आले.

**ब.२. अभ्यासकेंद्र ( विमान बिल्डिंग ):**

कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील सर्व संलग्न महाविद्यालयातील पदवीपूर्व विद्यार्थी व विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभागातील विद्यार्थी यांना वाचनाच्या सोयी उपलब्ध करून देण्यासाठी अभ्यासकेंद्राची स्थापना करण्यात आली आहे. एम.फिल., पी. एच. डी. विद्यार्थी तसेच नेट / सेट व स्पर्धा परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांनाही या अभ्यासिकेत प्रवेश दिला जातो.

सन २०२५ -२६ या शैक्षणिक वर्षात कोल्हापूर शहरातील विविध महाविद्यालयात शिकणाऱ्या २७ विद्यार्थ्यांना अभ्यासिकेत प्रवेश देण्यात आला. नेट / सेट व स्पर्धा परीक्षेच्या तसेच पदव्युत्तर विभागातील २५० विद्यार्थ्यांनी अभ्यासिकेचा उपयोग करून घेतला.

हे अभ्यासकेंद्र दररोज व सर्व रविवार तसेच सुट्टयांच्या दिवशी सकाळी ६ ते रात्री १२ असे १८ तास अभ्यासासाठी खुले असते.

या केंद्रात पदवीपूर्व व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी लागणारी क्रमिक पुस्तके व संदर्भ ग्रंथ ठेवण्यात आले असून ती ओळखपत्रावर संदर्भासाठी दिली जातात.

एकूण ग्रंथांची संख्या १३,७२३. इतकी आहे तसेच ०६ वर्तमानपत्रे विद्यार्थ्यांना वाचनाकरिता उपलब्ध करुन दिली आहेत. प्रति विद्यार्थी रु. २८३/- फक्त ग्रंथालय शुल्क म्हणून आकारण्यात आले. अभ्यासिकेमध्ये वाचकांच्या दैनंदिन हजेरीचे प्रमाण ८०-१०० इतके होते. पदव्युत्तर विभागातील काही प्राध्यापकांनी या अभ्यासकेंद्राच्या सुविधांचा उपयोग करून घेतला.

**क -नियतकालिक विभागः**

नियमित व संशोधक विद्यार्थ्यांच्या वाढत्या मागणीची गरज भागविणेसाठी नियतकालिक विभाग कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.२० ते संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत कार्यान्वित होता. सदर विभागाचा दररोज

सरासरी ७१ वाचकांनी लाभ घेतला. शिक्षणासाठी व संशोधक विद्यार्थ्यांसाठी ॲकॅडमीक रिसोर्स सेंटरची सेवा पुरविण्यात आली.

**ड: अर्काइव्हल सेल विभाग**

अर्काइव्हल सेल विभागातील ५८,१४८ दूर्मिळग्रंथ व ९,१६३ हस्तलिखिते बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्रात उपलब्ध आहेत. अहवाल सालात ५३० संशोधकांनी व वाचकांनी या विभागाच्या सेवांचा लाभ घेतला.

**ई: प्रबंध, शोधनिबंध, अहवाल व संदर्भ विभागः**

या विभागात एम. फील., पी. एच. डी., लघु व दीर्घ संशोधन प्रबंध, शोधनिबंध, लोकसंख्या अहवाल (सेन्सस रिपोर्ट), जिल्हानिहाय सांख्यिकी अहवाल व संदर्भ साधने, इत्यादी संशोधक /अभ्यासकांच्या उपयोगासाठी ठेवले आहेत. या कालावधीत १०१५ संशोधक विद्यार्थ्यांनी या विभागाचा लाभ घेतला. या विभागात विविध विषयांवरील एकूण ८२१३ पुस्तके संदर्भासाठी उपलब्ध आहेत.

**१०.४ ग्रंथालय संगणकीकरण सद्यस्थितीः**

ग्रंथालयातील वाचन साहित्याचे Retro conversion SOUL 3.0 या संगणक प्रणालीत करण्याचे काम सुरू असून सदर वाचन साहित्याची सुचीबद्ध माहिती OPAC / WebOPAC/m-OPAC इंटरनेटद्वारे उपलब्ध करण्यात आलेली आहे. याबरोबरच नव्याने खरेदी केलेल्या पुस्तकांचे उपार्जन, तालिकीकरण, तांत्रिक प्रक्रिया व ग्रंथदेव-घेव मोडयुल्स इ. SOUL या संगणक प्रणालीत चालू करण्यात आलेल्या आहेत. OPAC इंटरनेट आणि ई-रिर्सोसेस इत्यादी ऑनलाईन सुविधा देखील ३५ संगणकांमार्फत, २ वर्कस्टेशन्स व २५ टर्मीनलमार्फत दिल्या जातात. ग्रंथ देवघेव बाबत एसएमएस आणि ई-मेल सुविधा प्रत्येक वाचकाला SOUL 3.0 मार्फत सुरु करण्यात आली आहे.

**१०.५ शिव ज्ञानसागरः-**

शिव ज्ञानसागरः शिवाजी विद्यापीठाची इंस्टिटयुशनल रिपॉझिटरी आहे. शिव ज्ञानसागर हे वार्षिक अहवाल, दीक्षांत समारंभातील भाषणे, फोटो, प्रबंध, पेटंट्स, संशोधन पेपर्स, कॉन्फरन्स प्रोसिर्डिंग्स, वृत्तपत्रे, प्राध्यापकांची प्रकाशने आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर प्रकाशने तसेच इतर प्रकाशनांच्या प्रसारासाठी एक संस्थात्मक इंस्टिट्युशनल रिपॉझिटरी आहे. सदर रिपॉझिटरीमध्ये प्रकाशने संग्रह करणे, इंडेक्स करणे, प्रसार आणि जतन करण्याची क्षमता आहे. शिवाजी विद्यापीठाच्या ई-वापरकर्ता समुदायासाठी तसेच समाजासाठी हे उपयुक्त ई-संसाधन संग्रह आहे. एकूण ३७१० इतके फुल-टेक्स्ट वाचन साहित्य २४ × ७ उपलब्ध आहे.

**१०.६ ग्रंथ बांधणी-**

अहवाल सालात २०० नियतकालिकांचे खंड बांधणी करण्यात आली.

**१०.७ शिक्षकांची वैयक्तिक ग्रंथालय योजनाः**

०१ जुन २०२५ ते ३१ मे २०२५ या कालावधीत १५ शिक्षकांनी व कर्मचाऱ्यानी या योजनेचा लाभ घेतला आहे.

**१०.८ ग्रंथालय भेटीस आलेले वाचक / पर्यटकः**

अहवाल सालात महाविद्यालये /शैक्षणिक संस्था येथील सहली व अभ्यास सहलीसाठी आलेले एकूण ११४४ विद्यार्थी /पर्यटक यांनी बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्रास भेट दिली.

**१०.९ विशेष घटनाः**

१ बॅ . बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र (BBKKRC ), ग्रंथालय आणि माहिती विज्ञान विभाग (DLISc.) यांनी महाराष्ट्र विद्यापीठ आणि महाविद्यालय ग्रंथालय संघटना (MUCLA ) यांच्या संयुक्त विद्यमाने ६-७ मार्च रोजी " कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातील ग्रंथपाल व्यवसायाची कल्पना" या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले.

२ दि. २८ फेब्रुवारी, २०२६ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त (NSD)" विज्ञानातील महिला : कॅटलाजिंग विकसित भारत" ( विज्ञानी महिला : गतीशील विकासित भारत) या विषयावरील पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

३ दीक्षांत समारंभ निमित्त ग्रंथमहोत्सव दि. २३ ते २४ डिसेंबर २०२५ दरम्यान एक भव्य ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

४ मुंबई बॉम्बस्फोटातील पोलीस कर्मचा-यांच्या बलिदानाचा सन्मान करण्यासाठी दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी 'शहीद दिन' साजरा करण्यात आला आणि त्याच दिवशी 'भारतीय संविधान दिन' देखील साजरा करण्यात आला.

५ भारतीय राज्यघटनेच्या प्लॅटिनम ज्युबिली वर्षानिमित्त ( 'संविधान अमृतमहोत्सवी वर्ष'), शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरने १५ ऑक्टोबर २०२५ रोजी विद्यापीठाच्या सर्व विभागांनी तसेच संलग्न महाविद्यालयांनी " वचन प्रेरणा दिन " कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

६ विद्यापीठातील नवीन विद्यार्थ्यांसाठी ( पदव्युत्तर आणि संशोधन ) ग्रंथालय परिचय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता,ज्यामध्ये १२ ऑगस्ट २०२५ ते १३ ऑगस्ट २०२५ या कालावधीत व्याख्यान सादरीकरणाद्वारे ग्रंथालयाविषयी माहिती देण्यात आली, त्यानंतर १४ ऑगस्ट २०२५ ते २१ ऑगस्ट २०२५ या कालावधीत ग्रंथालय दौरा आयोजित करण्यात आला होता.

७ दि. १ ऑगस्ट २०२५ रोजी 'बॅ. बाळासाहेब खर्डेकर जयंती' साजरी करण्यात आली.

८ ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अधिविभागाच्या ६२ व्या स्थापना दिनानिमित्त बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र आणि ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अधिविभागाच्या वतीने दि. २२ जुलै, २०२५ रोजी ग्रंथालय

आणि माहिती शास्त्र विद्यार्थी आणि शिक्षकाच्या फायद्यासाठी “ शैक्षणिक ग्रंथालयांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) “आव्हाने आणि संधी “ या विषयावर एक पॅनल चर्चा आयोजित केली होती.

**१०.१० प्राप्त पुरस्कार २०२५ -२६**

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर वर्धापन दिन कार्यक्रमामध्ये ‘ स्वच्छता सप्ताह अभियान – प्रशासकीय गुणवत्ता अभियान’ अंतर्गत दि. १८ नोव्हेंबर २०२५ रोजी स्टडी सेंटर ग्रंथालयास तृतीय पुरस्काराने गौरविण्यात आले.